# भारताचे शेजारी, अमेरिकेतील झुंडशाही

## पुरन्दरे चन्द्रशेखर

**बांगलादेश**

मियांमार [ब्रह्मदेश]मधील राखीन नावाच्या राज्यात गेली बरीच वर्षे मुस्लिमांचा वंशसंहार चालू आहे. त्या मुस्लिमांना रोहिंग्या मुस्लिम म्हणतात. मियांमारमध्ये बौद्धधर्मीय बहुसंख्य आहेत. ती जनता आणि लष्कर दोघे मिळून हे हत्याकांड चालवत आहेत. त्यात वस्त्या जाळणे , स्त्रियांवर अत्याचार, ठार मारणे हे सर्व प्रकार होत आहेत. त्यामुळे आजवर लाखोंनी मुस्लिम निर्वासित झाले आहेत. [*आंदोलन* ऑक्टोबर २०१७ मध्ये या प्रश्नाचा सविस्तर आढावा घेतला आहे.] ते जगभर पसरले आहेत. अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे विकसित देशात काही हजारात तर मुस्लिम देशात - पाकिस्तान, सौदी अरेबिया, मलेशियामध्ये प्रत्येकी काही लाखात. सगळ्यात जास्त सुमारे १२ ते १५ लाख बांगलादेशात आहेत कारण बांगलादेश मियांमारला लागून आहे आणि मुस्लिम-बहुल आहे.

आधीच बांगलादेश दाट लोकवस्तीचा देश आहे, विकसित देशांसारखा तो श्रीमंतही नाही. त्यामुळे या लोकांचे इतक्या मोठ्या प्रमाणावर आगमन त्याला झेपणारे नाही. Cox bazar या राजधानी ढाकाच्या दक्षिणेला असणाऱ्या शहराजवळ तापुरत्या छावणीत निर्वासितांना सामावून घेण्यात आले आहे. तेथे रहाण्याची 'व्यवस्था' नाममात्र आहे. कमीतकमी जागेत लोक दाटीवाटीने राहतात.

संयुक्त राष्ट्रसंघ, इतर देश, स्वयंसेवी संघटना आणि बांगलादेश सरकार यांच्या दानावर त्यांची गुजराण अवलंबून असते. पिण्याचे पाणी शुद्ध नसते, अस्वच्छता असते, यामुळे होणाऱ्या रोगराईत आता कोविदची भर पडली आहे. एकूण हलाखीचे निम्न-मानवी जीवनमान.

या १२-१५ लाखांतील निदान लाखभर तरी लोकांना दुसरीकडे हलवावे असा विचार बांगलादेशात सुरू झाला. त्यासाठी वीस वर्षांपूर्वी आपलेआप जन्माला आलेले एक बेट निवडण्यात आले. याचे नाव चार भसन. ते बंगालच्या उपसागरात येते. ते निर्मनुष्य आहे. ते चितगाँव या बंदराच्या जवळ येते. मुख्य जमिनीपासून बेटाचे अंतर ३० कि.मी. आहे. म्हणजे, वाहतुकीच्या सुविधेखेरीज ते अंतर पार करणे पुनर्वसितांना शक्य नाही. बांगलादेशाच्या आरमाराने अलीकडे तेथे निर्वासितांसाठी छावणी उभारली आहे.

या पुनर्वसनाची सुरुवात डिसेंबरमध्ये झाली. ४ आणि २९ डिसेंबरला लोकांना तेथे नेण्यात आले. आजमितीला एकूण ३४०० लोक तेथे रवाना करण्यात आले आहेत. जानेवारीच्या शेवटी आणखी २००० लोकांना हलवण्याचा सरकारचा इरादा आहे.

या प्रश्नाला अनेक पदर आहेत. संबंधित संस्थांमध्ये प्रथम संयुक्त राष्ट्र संघ. मदतीत त्याचा सिंहाचा वाटा आहे. त्याच्या मते या बेटावर राहण्याची परिस्थिती किमान मानवी जीवनमानाची आहे का, हे तपासणे आवश्यक आहे. त्यानंतरच हे स्थलांतर केले जावे. पण राष्ट्रसंघाच्या प्रतिनिधींना बेटाचे सर्वेक्षण करण्याची परवानगी बांगलादेशाने दिलेली नाही. हे बेट समुद्राची पाण्याची पातळी वाढली तर संपूर्णपणे पाण्याखाली जाऊ शकेल. तेथे वादळांचे प्रमाणही जास्त आहे. दुसरा मुद्दा असा की त्या बेटावर स्थलांतरित व्हायचे का नाही यासाठी लोकांची पूर्वसंमती आवश्यक असावी. सरकारी दावा असा की ज्या लोकांनी या स्थलांतराला मंजुरी दिली, त्यांनाच हलवण्यात येत आहे. पण ज्या काही तुरळक मुलाखती जागतिक प्रसारमाध्यमात आल्या आहेत त्यानुसार असे १०० टक्के घडल्याचे दिसत नाही. काही लोकांबाबत जबरदस्तीने कुटुंबाशी ताटातूट, काहींबाबत पैशाचे आमिष, काहींबाबत परत मियांमारला पाठवण्याच्या योजनेत प्राधान्य मिळेल असे आश्वासन, असे अनेक प्रयत्न सरकार करत आहे. ते सगळेच नैतिक म्हणता येणार नाहीत. मानवी हक्कांची ही पायमल्ली आहे अशी टीका होत आहे. एका परीने ते बरोबर आहे. पण या परिस्थितीत बांगलादेशाने करायचे काय हा प्रश्न अनुत्तरित रहातो.

ग्रीसमध्ये अशाच दूरच्या बेटावर निर्वासितांना वसवण्यात आले, त्याचा उल्लेख मागे केला होता. [*आंदोलन , ऑक्टोबर*

२०२०] मुळात हे लोक ज्या कारणाने विस्थापित होतात, त्या कारणांकडे लक्ष दिले पाहिजे. म्हणजे मियांमारमधील धार्मिक वैराचा प्रभाव कसा कमी होईल हे पाहायला हवे. बौद्ध बहुसंख्य त्यांचे ते काही रातोरात विचारसरणी बदलणार नाहीत हे आजवरच्या वर्तणुकीवरून स्पष्ट आहे. ही दुश्मनी पारंपरिक आहे, तीत धार्मिक अस्मिता मुरलेली आहे. म्हणजे मनोपरिवर्तन बाद होते. मग दबावतंत्र. मियांमारवर आंतरराष्ट्रीय न्यायालयाने कायदेशीर किंवा आंतरराष्ट्रीय व्यापाराने आर्थिक दडपण आणणे. हे पर्याय आहेत. तसे थोडेफार प्रयत्न होत आहेत पण प्रश्नाच्या मानाने ते अगदीच अपुरे ठरले आहेत. जर राजवट रोहिंग्यांना अनुकूल धोरणे आखत नसेल, किंबहुना, प्रश्न आहे हेच अमान्य करत असेल, तर उर्वरित जग [प्रत्यक्ष लष्करी कारवाईखेरीज] फार काही करू शकेल असे दिसत नाही. त्यात आंतरराष्ट्रीय न्यायालयाला निर्णय राबवण्याचे सामर्थ्य नाही. त्यांचा निर्णय हा फक्त उपदेशात्मक रहातो, बंधनकारक नाही. आर्थिक बाबतीत मियांमारमधून होणाऱ्या निर्यातीवर बंधन घालण्याने सरकारी तिजोरीत कमी पैसा जमा होईल पण त्याने लोकांची मानसिकता बदलत नाही आणि शेवटी त्याची किंमत रोजगार गेल्याने गरीब भरतो. या परिस्थितीत मानवी हक्कांचा गजर फक्त टीका करण्यापुरता रहातो.

विशेष म्हणजे, आपला प्रभाव वाढवण्यासाठी आता चीन या प्रकरणात उतरला आहे. त्यामुळे गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. चीनचा मुस्लिमविरोध तद्देशीय विघर मुस्लिमांविरुद्धच्या धोरणात दिसून येत आहे. इथे बांगलादेशही मुस्लिम व रोहिंग्याही मुस्लिम.

एकूण याचे निष्पन्न दोन प्रकारे दिसणे शक्य आहे. एक म्हणजे मियांमार सरकारविरुद्ध मुस्लिम आतंकवादाला पोषक वातावरण - तो आतंकवाद सुरू झाला आहे; दुसरे म्हणजे चीनचा आर्थिक-भौगोलिक प्रभाव वाढणे. यात सर्वहारा रोहिंग्या मुस्लिमांची दखल ना आतंकवादी घेणार, ना चीन.

**अफगाणिस्तान**

अफगाणिस्तानात गेली चाळीसहून अधिक वर्षे हिंसक अराजक आहे. त्यामागे आधी रशियाचे आक्रमण, त्यामुळे सत्तापालट, मग तलेबानचा उदय, त्याचबरोबर अल कईदाचा प्रवेश, पाकिस्तानचा सततचा हस्तक्षेप, अमेरिकन लष्कराची नियुक्ती अशी अनेक अर्वाचीन कारणे आहेत.

शेवटी आता कोठे अमेरिकेने सैन्य काढून घेतल्यानंतरच्या परिस्थितीवर अफगाण सरकार आणि तलेबान यांच्यात वाटाघाटी चालू आहेत. वाटाघाटींच्या दरम्यान युद्धविराम पाळला जाईल असे आश्वासन तलेबान वारंवार देतो आणि हिंसक कारवाया चालूच ठेवतो. या कारवाया दोन प्रकारच्या असतात. एक प्रकार म्हणजे एखादी संपूर्ण ग्रामीण वस्ती उद्ध्वस्त करणे, तेथील लोकांची सरसकट हत्या करणे. दुसरा प्रकार म्हणजे विशिष्ट व्यक्तींना लक्ष्य करून त्यांची हत्या करणे. दुसरा प्रकार अलीकडे वाढत आहे. गेल्या वर्षी एकूण १३६ नागरिकांच्या आणि १६८ सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या हत्या झाल्या. आजवरच्या वर्षांत ही सगळ्यात जास्त वार्षिक संख्या.

तलेबानच्या राजवटीत स्त्रियांच्या हक्कांवर - शिक्षणापासून पुढे - गदा आली. त्यांच्या अस्तानंतर किमान ती परिस्थिती सुधारत आहे असे वाटत होते. निदान मुलींच्या शाळा सुरु झाल्या. पण खालील हल्ल्यांवरून घड्याळाचे काटे उलटे फिरताना दिसतात.

उदाहरणार्थ काही घटना अशा -

डिसेंबरमध्ये काबूलमध्ये तुरुंगाच्या प्रमुख महिला डॉक्टरची तिच्या सहकाऱ्यांबरोबर हत्या झाली. ते सगळे कामावर शासकीय गाडीतून जात होते.

जानेवारीत सुप्रीम कोर्टाच्या दोन महिला न्यायाधीशांची काबूलमध्ये हत्या करण्यात आली. त्या कोर्टाच्या गाडीतून कामाला जात असताना मोटारसायकलवरून खुनी आले आणि गोळीबार केला. खुनी गायब झाले.

जानेवारीतच काबूलमध्येच पोलीस दलातील कर्नल असणाऱ्या उच्चपदस्थ महिलेवर असाच हल्ला झाला. तिने बंदुकीला उत्तर म्हणून गोळीबार केला. तिची चार वर्षाची मुलगीही तिच्याबरोबर गाडीत होती. सुदैवाने तेथे कोणी दगावले नाही.

म्हणजे शासकीय अधिकारी स्त्रियांवर खुनी हल्ले होत आहेत. हे लक्ष्य निवडून केलेले हेतुपुरस्सर हल्ले आहेत. एरवी अशा हल्ल्यांची 'जबाबदारी' एखादी संघटना स्वीकारते. तसे या हल्ल्यांच्या बाबत दिसून येत नाही. विशेषत: तलेबानने प्रसंगी 'आम्ही याला जबाबदार नाही' असेही जाहीर केले आहे. तलेबान नाही तर अल कईदा, इस्लामिक स्टेटचे स्थानिक हस्तक किंवा त्यांचे फुटकळ भाडोत्री धर्मयोद्धे असतात. यांच्याबरोबर अमली पदार्थांचे व्यापारी, भ्रष्ट सरकारी नोकर यांचेही हितसंबंध असतात. सम्पूर्ण अराजकात बळी

तो कान पिळी. शांततेच्या वाटाघाटी यशस्वी होणे या लोकांना गैरसोयीचे आहे. कारण यादवी वाढली तर त्यांचे प्रभाव क्षेत्र वाढते, व्यापार वाढतो. त्याबरोबरच दहशत वाढते, लोकांचा सरकारवरचा विश्वास कमी होतो.

कर्मठ मुस्लिम स्त्री-द्वेष, गुन्हेगारी आणि प्रस्थापित राजवटीला विरोध या घटनांत एकत्र आले आहेत.

**पाकिस्तान**

पाकिस्तानातील बलुचिस्तान या राज्याची पाकिस्तानपासून अलग होण्याची गेली अनेक वर्षे मागणी आहे. केंद्र सरकार बलुचिस्तानला सापत्न भावाने वागवते, त्यांचे मानवी हक्क नाकारते, तेथील विरोधक 'गायब' केले जातात, तेथे तैनात लष्कर जनतेवर अत्याचार करते अशा अनेक प्रश्नांविरुद्ध तेथील पत्रकार आवाज उठवत असतात. त्यांना तेथे रहाणे अशक्य झाल्याने पश्चिमेतील देशात काहीजण आश्रय घेतात. तेथेही ते सुरक्षित नसतात कारण पाकिस्तानी राजवट आपले हस्तक तेथे पाठवून त्यांची हत्या करते. अशा दोन पत्रकारांचा संशयास्पद मृत्यू अलीकडे झाला.

मागच्या मार्च महिन्यात साजिद हुसेन हा स्वीडनमध्ये आश्रय घेतलेला पत्रकार एका ट्रेनमध्ये बसला. त्यानंतर त्याचा ठावठिकाणा लागला नाही. मे महिन्यात एका नदीत त्याचा मृतदेह आढळला. असाच प्रकार कॅनडामध्ये आश्रय घेतलेल्या करीमा बलोच या महिला पत्रकाराबाबत डिसेंबरमध्ये झाला. दोन्ही मृत्यू संशयास्पद नाहीत असे त्या त्या देशाच्या पोलिसांनी जाहीर केले आहे. त्या निष्कर्षावर दोन्हींच्या कुटुंबियांचा विश्वास नाही. हे पाकिस्तानी सरकारचे काम आहे असे त्यांचे म्हणणे. ते पुन्हा चौकशीची मागणी करत आहेत.

दमनकारी राजवटींना बुद्धिजीवी सलतात हे इथेही दिसून येत आहे.

**अमेरिका**

अमेरिकेत निवडणुका पार पडून जो बायडेन विजयी होऊनही पुढे बरेच काव्य झाले. मागच्या लेखात म्हटल्याप्रमाणे [डिसेंबर २०१९] ट्रम्पने हार अमान्य केली. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे, हरला तरी ट्रम्पला साडेसात कोटी अमेरिकनांनी मतदान केले होते. यात 'गोरे श्रेष्ठ' या मताचे लोकही होते. त्यांच्या भरोशावर निकाल रद्द करून घेण्याचे सगळे वैध, अवैध मार्ग ट्रम्पने शेवटच्या क्षणापर्यंत अवलंबले.

६ जानेवारीला विद्यमान उपाध्यक्ष नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची नावे जाहीर करतो अशी प्रथा आहे. तेव्हा उपाध्यक्षाने निवडणूक रद्द करावी असा दबाव आणण्याचा अयशस्वी प्रयत्नही ट्रम्पने आधी केला.

अखेर तर त्याने काही हजारात आपले समर्थक वॉशिंग्टनमध्ये जमवले. संसदेचे अधिवेशन सुरू झाले. तेव्हा संसदेबाहेरच्या सभेत या समर्थकांना संसदेवर हल्ला करावा व 'द्रोही' खासदारांना वठणीवर आणावे असे आवाहन त्याने केले. हा सगळा अविश्वसनीय प्रकार होता. ज्या संसदेचा तो घटनात्मक नेता, तोच राष्ट्राध्यक्ष स्वत: संसद अमान्य करतो आणि तिच्याविरुद्ध लोकांना भडकावतो, यात निर्वाचित लोकशाहीचे धिंडवडे निघाले.

समर्थक त्याच्या सांगण्यानुसार संसदेला रवाना झाले. त्यातील बरेचसे सशस्त्र होते. या झुंडीने अधिवेशन चालू असताना संसदेत प्रवेश केला. पोलीस या प्रचंड व आक्रमक जमावाला रोखू शकले नाहीत. आत गेल्यावर 'उपाध्यक्षाला फाशी द्या, लोकसभापती कोठे आहे?' अशा घोषणा देत त्यांनी संसदेत धुमाकूळ घातला. [लोकसभापती या विरोधी डेमोक्रॅट पक्षाच्या आहेत - नॅन्सी पेलोसी. त्या जहाल ट्रम्पविरोधी आहेत] मग सुरक्षेची अधिक कुमक आली आणि त्यांनी लोक-प्रतिनिधींना सुरक्षित ठिकाणी हलवले. जीवाच्या भीतीने अनेक खासदार टेबलांखाली लपूनही बसले.

संपूर्ण इमारतीतून या लोकांना बाहेर काढण्यात चार तास गेले. या धामधुमीत पाचजण मरण पावले. मग ती इमारत सुरक्षित झाली आणि जो बायडेन अमेरिकेचा ४६वा अध्यक्ष झाला.

या तमाशाचा परिणाम म्हणून ट्रम्पची [दुसऱ्यांदा] संसदीय चौकशी सुरू झाली. ट्विटरवरील अकाउंट बंद होऊन समर्थकांपर्यंत पोचण्याचा त्याचा आजवरचा मार्ग खुंटला, पक्षाचे देणगीदार आटले, वगैरे.

लोकशाही ही व्यवस्था किती नाजूक असते व ती टिकवणे किती अवघड असते, ते उघड झाले. हा जगभरच्या लोकशाही राष्ट्रांसाठी इशारा आहे. कोणीही उपटसुम्भ झुंडशाहीने ती धोक्यात आणू शकतो.

http://www.art-non-deco.com
purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk